वर्ष १२ वे

अंक १ ला

जो द्रव्य वाढवतो तो काळजी वाढवतो,
परंतु जो विद्या वाढवतो तो ज्ञान वाढवतो !




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)
यांचे मुखपत्र

# संवाद

## नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- बांधकामाचा एकूण अपेक्षित खर्च रु.१ कोटी २० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०’ x १४’
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**डिसेंबर २०११
जाने.-फेब्रु.-मार्च २०१२**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

## आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ५००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

**जी दानशूर व्यक्ती मंडळाच्या शैक्षणिक फंडास रुपये एक लक्ष किंवा अधिक देणगी देईल त्या व्यक्तीने शिफारस केलेल्या विद्यार्थ्यास वसतिगृहाच्या मासिक शुल्कामध्ये दरमहा रु.५००/- शिष्यवृत्तीच्या स्वरुपात सवलत देण्यात येईल.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

दिनांक २४ जुलै, २०११ रोजी आपल्या मित्र मंडळाचा **स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव समारंभ** अत्यंत दिमाखाने पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बाहेरची मंडळी आयात करण्याची वेळ आली नाही. आपल्याच तालुक्यातील बुद्धीवंत मंडळी पाहुणे म्हणून आपल्याला लाभली, याबद्दल मी समाधान व्यक्त करतो. **मा.शिवाजीराव झावरे,** सी.ए. तसेच **मा.बाळासाहेब शिंदे** ही पारनेरकर मंडळी **राष्ट्रीय स्तरावर** काम करतात हे या निमित्ताने समाजासमोर आले. त्यांच्याकडून तरुण वर्ग काही प्रेरणा घेईल ही अपेक्षा !

या महिन्यात **पारनेर तालुका मित्र मंडळाची स्थापना होऊन ३२ वर्षे पुर्ण झाली.** शुन्यातून निर्माण केलेल्या या फकिरी वृत्तीच्या मंडळासाठी अनेक व्यक्तींनी योगदान दिले आहे, त्या सर्वांच्या प्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. अनेक प्रकारची ज्ञात, अज्ञात कामे, विचारांची देवाणघेवाण या मंडळाच्या कार्याच्या माध्यमातून झाल्याचे निश्चितपणे जाणवते. त्यामध्ये **आदरणीय भोंग गुरूजी ते हौसाराम घोडके** यांचा सिंहाचा वाटा आहे. हे नमूद करणे मी माझे कर्तव्य समजतो.

आपल्या मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह आता पुर्ण क्षमतेने सुरू झालेले आहे, त्याबद्दल सर्व सभासदांचे व हितचिंतकांचे मी आभार मानतो, कारण ज्या हेतूने आपण हे कार्य हाती घेतले आहे, तो हेतू या निमित्ताने सफल होत असल्याचे दिसून येत आहे. गरजू विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेणे अपेक्षित आहे.

मागील वर्षापासून आपण **मुलींच्या वसतिगृहासाठी - जागा व बांधकामाबाबत - सारखा पाठपुरावा करीत आहोत**. तथापि, अद्याप त्यासाठी दानशूर व्यक्तींचे सहकार्य लाभलेले नाही. याबाबत सर्व सभासद व हितचिंतकांना मी आव्हान करतो की, आपण याबाबत पुढाकार घेऊन आपले कार्य दानशूर मंडळींपर्यंत पोहचवावे म्हणजे कोणीतरी योगदान देण्यासाठी पुढे येईल. ही अपेक्षा लवकर पुर्ण होईल अशी इच्छा व्यक्त करतो.

**भ्रष्टाचार विरोधी आंदोलनामुळे आदरणीय अण्णांच्या माध्यमातून पारनेर तालुका आता जगाला माहीत झाला आहे.** अण्णांच्या आंदोलनाला सक्रीय पाठींबा व्यक्त करण्याकरीता आपल्या **वसतिगृहापासून ते राळेगण सिद्धीपर्यंत शिवश्री हौसाराम घोडके** यांच्या नेतृत्वाखाली **८०० नागरिकांची उत्स्फूर्त संदेश यात्रा** आयोजित करण्यात आली. हेही मला या ठिकाणी अभिमानाने नमूद करावेसे वाटते.

लिहीण्यासारखे आणि करण्यासारखे खूप काही आहे. मनात सुद्धा खूप काही आहे. ते करण्यासाठी वेळसुद्धा आहे व ते पुढील अंकामध्ये लिहीण्यासाठी मी आताच येथेच अर्धविराम देतो. **पुढील २०१२ या वर्षासाठी मी मंडळातर्फे आपणास शुभेच्छा देतो.**

जय जिजाऊ। जय शिवराय।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० |
| श्री.सखाराम गागरे | उपाध्यक्ष | ९७३००७५०३३ |
| श्री.बाजीराव जगदाळे | सेक्रेटरी | ९०११०२१४३० |
| श्री.सुनील पोटे | सहसेक्रेटरी | ९२२६९२१०८८ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | कार्यवाहक | ९८२२०५१५९३ |
| श्री.मधुकर शिरोळे | सहकार्यवाहक | ९९२२१६६१२५ |
| इंजि.विजयकुमार ठुबे | सदस्य | ९४२२०२६२२५ |
| श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.काशिनाथ गायकवाड | सदस्य | ९४२२०१७९४० |
| श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| श्री.अशोक वाबळे | सदस्य | ९८८१६०८३५७ |
| श्री.तारकराम झावरे | सदस्य | ९४२३७८८९१७ |
| श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| श्री.प्रा.गोरक्ष जगताप | सदस्य | ९८६०९०७६१८ |

# वसतिगृह प्रवेश

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे चे सर्व सोयींनी युक्त असे वसतिगृह मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे सुरु झाले असून प्रवेशासाठी खालील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**१) श्री.अशोक विश्वनाथ वाबळे - मो.९८८१६०८३५७ २) श्री.मधुकर हौशाभाऊ शिरोळे - मो.९९२२१६६१२५**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम वृत्तांत

रविवार दिनांक २४.०७.२०११ रोजी पारनेर तालुका मित्र मंडळाचा स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा मंडळाच्या विद्यार्थी वसतिगृहामध्ये घेण्यात आली. स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी **मा.शिवाजीराव झावरे**, सदस्य, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् ऑफ इंडिया, संचालक, झावरे प्रोफेशनल ॲकॅडमी हे होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून **मा.बाळासाहेब शिंदे**, सिनीयर क्वालिटी ॲश्युरन्स (पूर्व विभाग प्रमुख), संरक्षण खाते, भारत सरकार व, **मा.बन्सी भागूजी गवळी**, उपजिल्हाधिकारी, अलिबाग हे होते. प्रमुख उपस्थितांमध्ये **मा. भास्करराव शेळके**, **मा.विश्वनाथजी कोरडे**, **मा.डॉ.मुकुंदराव गायकवाड**, **मा.रामा एरंडे**, **मा.भगवान पठारे**, **मा.नानासाहेब खोडदे**, इ. मान्यवर व मंडळाचे सर्व पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून दीप प्रज्वलन करण्यात आले. व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

मा.अध्यक्षांचा परिचय मंडळाचे कार्यवाहक **डॉ.बाळासाहेब बांडे** यांनी करून दिला. तसेच प्रमुख पाहुणे **श्री.बाळासाहेब शिंदे** यांचा परिचय **प्रा.गोरक्ष जगताप** यांनी तर **श्री.बन्सी गवळी** यांचा परिचय सहकार्यवाहक **श्री.मधुकर शिरोळे** यांनी करून दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना **इंजि.विजयकुमार ठुबे** यांनी पारनेर तालुका मित्र मंडळाच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला व भावी कार्यक्रमाची दिशा स्पष्ट केली. वसतिगृह वास्तु उभी करण्यात मा.हौसाराम घोडके यांचे बहुमोल योगदान असल्याचे नमूद करताच त्यास उपस्थित जनसमुदायाने टाळ्या वाजवून साथ दिली. वसतिगृहाच्या व्यवस्थापन, अंतर्गत रचना व सुविधा या विषयीची माहिती त्यांनी दिली. तसेच संवाद मुखपत्राचे संपादक या नात्याने मासिकासाठी आपले लेख, माहिती स्वागतार्ह असल्याचे आवाहन केले.

प्रास्ताविकानंतर पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वेब साईटचे उद्‌घाटन मा. अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. विविध क्षेत्रातील गुणवंत ग्रामस्थांचा परिचय मंडळाचे कार्यवाहक **डॉ.बाळासाहेब बांडे** यांनी करुन दिला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सदर ग्रामस्थांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यानंतर इ.१० वी च्या गुणवंत विद्यार्थी यादीचे




*व्यासपीठावर बसलेले डावीकडून मा.भास्करराव शेळके, मा.बाळासाहेब शिंदे, मा.शिवाजीराव झावरे, मा.नानासाहेब खोडदे, मा.बन्सी गवळी व प्रास्ताविक करताना इंजि. विजयकुमार ठुबे.*




*मंडळाच्या वेबसाईटचे उद्‌घाटन करताना डावीकडून मा.मधुकर शिरोळे, मा.शिवाजीराव झावरे, इंजि. विजयकुमार ठुबे, श्री.सुश्रुत झावरे व डॉ.बाळासाहेब बांडे.*

वाचन **श्री.सुनील पोटे** यांनी केले. प्रमुख पाहुणे **श्री.बन्सी गवळी** यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''यश मिळविण्यासाठी गुरू हा आपला खरा पालक असतो. गुरूवर नितांत श्रद्धा ठेवावी. त्यांच्याकडूनच आपण घडतो.'' असा मोलाचा संदेश दिला. यानंतर १२ वी च्या गुणवंत विद्यार्थी यादीचे वाचन **श्री.मधुकरराव शिरोळे** यांनी केले. यानंतर प्रमुख पाहुणे **श्री.बाळासाहेब शिंदे** यांनी आपल्या भाषणामध्ये विद्यार्थ्यांना बहुमोल उपदेश करून मंडळाच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. कला, क्रीडा व पदवीधर क्षेत्रात प्राविण्य संपादन केलेल्या विद्यार्थी यादीचे वाचन **प्रा.गोरक्ष जगताप** यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांना श्री.शिवाजीराव झावरे



*व्यासपीठावर बसलेले डावीकडून मा.बाजीराव जगदाळे, मा.मिलींद सोबले, मा.वसंतराव खिलारी, मा.भास्करराव शेळके, मा.बाळासाहेब शिंदे, मा.शिवाजीराव झावरे, मा.नानासाहेब खोडदे, मा.बन्सी गवळी व अहवाल वाचन करताना मा.मधुकर शिरोळे.*

लिखीत **''माझे ध्यासपर्व''** हे पुस्तक गुलाबपुष्प व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

सत्कारार्थी विद्यार्थ्यांपैकी कु.प्रतिक ढुबे, कु.सौरभ जाधव व कु.राहुल खामकर यांनी तर ग्रामस्थांपैकी सौ.सिमा झावरे-मरकड व श्री.संजय खोसे यांनी प्रातिनिधीक स्वरुपात आपले मनोगत व्यक्त केले.

वसतिगृहाबरोबरच तालुक्यासाठी काय भरीव कार्य करता येईल याबाबत श्री.विश्वनाथजी कोरडे यांनी काही सुचना केल्या व त्याबरोबरच त्यांनी सुपे येथे १ एकर जागा उपलब्ध करुन देण्याचा मनोदय बोलून दाखविला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष **श्री.शिवाजीराव झावरे** यांनी मंडळाचे अध्यक्ष **श्री.हौसाराम घोडके** यांच्या



*पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वार्षिक स्नेह मेळाव्याचे अध्यक्ष मा.शिवाजीराव झावरे यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना मा.संजय खोसे, सी.ए.*

कार्यतत्परतेची प्रशंसा करून भाषणाची सुरुवात केली. आपल्या भाषणात त्यांनी विचार मांडताना ''मी जे घडलो, जे यश प्राप्त झाले ते केवळ पारनेरकर असल्यामुळेच.'' असा तालुक्याचा गौरव करून आपल्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. **'माझे ध्यासपर्व'** या पुस्तकाच्या माध्यमातून मी कसा घडलो याचा जीवन आलेख त्यांनी सर्व श्रोत्यांसमोर उलगडला. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावरच दिल्लीपर्यत मजल मारल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणानंतर मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन **श्री.भाऊसाहेब नरड सर** यांनी उत्तम प्रकारे केले. कार्यक्रमानंतर सर्वांनी मंडळातर्फे ठेवलेल्या स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

**शब्दांकन - श्री.भाऊसाहेब नरड, श्री.सुनील पोटे**



*पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वार्षिक स्नेह मेळाव्यास उपस्थित असलेला जनसमुदाय.*

# विद्यार्थी अभिनंदन - दहावी



कुमारी अक्षदा दिलीप
बेलोटे, रा.देवीभोयरे
९५%



कु.सौरभ बबन जाधव
रा.वेसदरे
९३.५%



कुमारी तेजल ललितकुमार
कर्नावट, रा.खडकवाडी
९३%



कु.सत्यम शशिकांत
आवारी, रा.रांधे
९२.५%


कुमारी स्नेहल बाळासाहेब
रोहोकले, रा.मांडवे खुर्द
९२%



कु.अजिंक्य रामदास बर्वे
रा.वासुंदे
९२%



कुमारी किरण अजिनाथ
ढेरे, रा.पुणेवाडी
९२%



कु.शंतनु मिलींद सोबले
रा.जामगाव
९१.५%



कु.ओंकार शरद गाडगे
रा.विरोली
९१%



कुमारी श्वेता शिवाजी शिंदे
रा.काळेवाडी
९०.५%

कुमारी अपुर्वा अशोक
सरोदे, रा.बाभुळवाडे
९०%



कुमारी कोमल सुरेश नगरे
रा.पारनेर
९०%



कु.ओंकार यशवंत औटी
रा.वडझिरे
८८%



कु.सौरभ भाऊसाहेब एरंडे
रा.वडझिरे
८७%

कु.निखील मंजाबापू गायके
रा.वासुंदे
८६%



कुमारी जुई श्रीकांत हांडे
रा.वडझिरे
८६%



कुमारी मेघना बाळासाहेब
लोंढे, रा.टाकळी ढोकेश्वर
८५%



कुमारी काजल जयसिंग
भालेकर, रा.वडनरे हवेली
८५%



कुमारी अक्षदा प्रभाकर
खणसे, रा.गांजीभोयरे
७२%



कु.मयुर माधव गायके
रा.वासुंदे
७२%

## बारावी

कु.सतीश भास्कर घावटे
रा.राळेगण थेरपाळ
८५%



कुमारी वीणा संजीव धुमाळ
रा.लोणी मावळा
७३%



कु.ऋषीकेश सुनील वाघुंडे
रा.कान्हूर पठार
७२.५%


# अभिनंदन



**डॉ.प्रा.हरिश्चंद्र गोविंद नवले,** रा.नवलेवाडी, हे पुणे विद्यापीठात तत्वज्ञान विभागामध्ये सहाय्यक प्राध्यापक या पदावर कार्यरत असून त्यांना **''शंकराचार्य व ज्ञानदेव यांच्या तत्वज्ञानाचा गीता भाष्याच्या संदर्भात तौलनिक अभ्यास''** या विषयावरील संशोधनात पुणे विद्यापीठातर्फे **पी.एच.डी.** पदवी प्रदान करण्यात आली.



संतसेवक **ह.भ.प. बबनराव विठोबा झरेकर** रा. कोहोकडी यांना त्यांच्या पारमार्थिक व सामाजिक कार्याबद्दल धानोरी फेस्टीवल २०११ चा **'समाज भूषण'** व संत ज्ञानेश्वर भजनी मंडळातर्फे 'वारकरी भूषण' पुरस्कार पुणे महानगरपालिकेचे महापौर मा.मोहनसिंग राजपाल यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.



**श्री.उत्तम बबनराव डेरे** रा.वडगाव आमली यांची त्यांच्या उत्कृष्ट कार्यप्रणालीबद्दल टाटा मोटर्स कंपनीतर्फे **'ऑफिसर्स ऑफ द इयर-२०१०-२०११'** साठी निवड झाली.



**श्री.पोपटराव आनंदराव जाधव** रा.कर्जुले हरेश्वर यांची श्री.साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था सांगवी पुणे २७ वर **अध्यक्षपदी** बिनविरोध निवड झाली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



शिक्षिका पेशा ते उद्योजक असा यशस्वी प्रवास केलेले कुबेर इंजिनियरींग वर्क्सचे कार्यकारी संचालक **श्री. भगवान सावळेराम पठारे** रा. राळेगण सिद्धी यांना त्यांच्या सामाजिक व औद्योगिक कार्याबद्दल मराठा सेवा संघातर्फे **'मराठा भूषण'** पुरस्कार प्रदान करण्यात आला.



**श्री.प्रभात रामदास शिर्के** रा.कर्जुले हरेश्वर हे बी.ई. (कॉम्प्युटर) असून त्यांना **एम.बी.ए. मार्केटींग**मध्ये प्रथम श्रेणी मिळाली.



**श्री.अभिजीत अरुण नरसाळे** रा.गोरेगाव हे बी.ई. मेकॅनिकल असून त्यांना **एम.बी.ए. मार्केटींग**मध्ये प्रथम श्रेणी मिळाली.

# अण्णांच्या आंदोलनास मंडळाचा पाठींबा

थोर समाजसेवक **पद्मभूषण डॉ.अण्णासाहेब हजारे** यांनी रामलीला मैदान, नवी दिल्ली येथे सुरू केलेल्या भ्रष्टाचार विरोधी लढ्यास पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वतीने जाहीर पाठींबा देण्यात आला. याचाच एक भाग म्हणून थेरगाव, चिंचवड, पुणे - ३३ येथील **पारनेर तालुका मित्र मंडळ वसतिगृह ते राळेगण सिद्धी** असे पुणेस्थित पारनेरकरांच्या वतीने भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. सकाळी ९ वा. वसतिगृहापासून ही रॅली निघाली व चिंचवड मार्गे पिंपरी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे आली. या ठिकाणी इतर भागातील पारनेरकर एकत्र आले व येथून मोटारसायकल, कार व जमेल त्या वाहनांने एक भव्य रॅली राळेगण सिद्धीकडे रवाना झाली.

जवळजवळ ८०० लोकांची शिस्तबद्ध अशी रॅली मार्गक्रमण करीत असता आजुबाजुच्या गावातील व रस्त्यावरील लोक उत्स्फूर्तपणे अण्णांचा जयजयकार करीत होते. रांजणगाव गणपती येथे सर्व सहभागींची जेवणाची व्यवस्था श्री.भगवान पठारे यांनी केली होती. ही रॅली पिंपरी-चिंचवड पुणे शहर, चंदननगर मार्गे राळेगण सिद्धी येथे पोहोचली. राळेगण सिद्धी येथे या रॅलीचे उत्स्फुर्त स्वागत करण्यात आले. या ठिकाणी रॅलीचे भव्य सभेत रुपांतर झाले. याच वेळी अण्णांच्या मागण्या मान्य झाल्याची बातमी सभेच्या ठिकाणी आली व सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात याचे स्वागत केले. मंडळाने अशा प्रकारे अण्णांच्या आंदोलनात सहभाग नोंदविला. **अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके, सचीव बाजीराव जगदाळे, मधुकरराव शिरोळे, अशोक वाबळे, मुरलीधर चौधरी, भगवान पठारे, भास्करराव शेळके, नानासाहेब खोडदे, संभाजीराव देठे** व पुणेस्थित राळेगण सिद्धी परिवार या सर्वांनी मिळून रॅलीचे यशस्वी आयोजन केले.

**शब्दांकन - सुनील पोटे**



# आपण असे केले तर



**कै.गिरीधारीलाल बिरदीचंद कटारिया** रा.तिखोल यांच्या दि. ०८.०८.२०११ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.नितीन यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.

**श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर** यांच्या दि. १६.८.२०११ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे भाचे प्रा. जगदीश तुकाराम देंडगे, रा. गांजीभोयरे व श्री. नामदेव मारुती साबळे, रा. रुई छत्रपती यांनी मंडळास प्रत्येकी **रु. १०००/-** देणगी दिली.



श्री.अशोक दिगंबर घोरपडे रा.चिंचोली यांनी त्यांची सुकन्या **कु.अक्षदा** हिच्या दि.२८.११.२०११ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रु.११०१/-** देणगी दिली.



**कै.भगवान काशिनाथ काळे** सर रा. गोरेगाव यांच्या दिनांक १९.१०.२०११ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.अनिकेत यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.



**चि. सोहम** यांच्या दिनांक ४.९.२०११ च्या वाढदिवसानिमीत्त पिताश्री श्री. तुकाराम विठ्ठल नरसाळे, रा. गोरेगाव यांनी मंडळास **रु. १०००/-** देणगी दिली.



**कै. सौ. सुशिला मारुती पोटघन** रा.जातेगाव यांच्या दिनांक १७.०८.२०११ च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र श्री.अविनाश यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



**कै.सदाशिव किसन शिंदे व कै.श्रीमती सिंधु सदाशिव शिंदे** रा. सारोळे अडवाई यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री. विकास व श्री. प्रविण यांनी प्रत्येकी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



**कै. श्रीमती लक्ष्मीबाई आश्रुजी आग्रे** रा.पारनेर यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री.आश्रुजी उर्फ बबनराव यांनी मंडळास **रु.५०००/-** देणगी दिली.



**कै.प्रा. मुकुंद दत्तात्रय वाघमारे** रा.पारनेर यांच्या दिनांक **२३.१०.२०११** च्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या पत्नी श्रीमती मृदुला यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.




**कै. दत्तात्रय नाना खोसे** रा.पाडळी दर्या यांच्या दि.२०.०२.२०१२ च्या व **कै.भामाबाई दत्तात्रय खोसे** यांच्या दि.१९.०९.२०११ च्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे सुपुत्र चि.गणेश यांनी मंडळास **रु.११११/-** देणगी दिली.



**कै.गणपतराव नारायणराव गाडगे** रा.विरोली यांच्या दि. १५.१२.२०११ च्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री.शरद यांनी मंडळास **रू.५००१/-** देणगी दिली.



**कै. सखाराम मारुतराव जगताप** रा.गोरेगाव यांच्या दि. ०६.०१.२०१२ च्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री.संदिप व श्री.सचिन यांनी मंडळास रू.१०००/- देणगी दिली.



**कै.आबासाहेब पुंजाजी लगड गुरूजी**, रा.लोणी ता.राहाता यांचे स्मरणार्थ सुपुत्र ॲड. सुरेश आबासाहेब लगड (सहाय्यक सरकारी वकील, अ'नगर जि. न्यायालय) यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.




**स्व.वसंतलाल कुंदनमल कोठारी,** रा.कान्हुर पठार यांचे दि.२२.०७.२०११ चे स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री. अशोकलालजी यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

**कै.तुळसाबाई रामभाऊ साबळे,** रा.रायतळे यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री.गोरक्षनाथ यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

## आपण असे केले तर




पारनेर तालुका युवा मंडळ नवी मुंबईचे अध्यक्ष **श्री.गणपत भागाजी वाफारे** रा.कर्जुले हरेश्वर यांनी मंडळास **रू.१०,०००/-** देणगी दिली. त्याच्या व्याजातून दरवर्षी गरजू विद्यार्थ्यास मदत दिली जाईल.



**कै.शिवाजी पाटीलबुवा कदम** रा.पिंपरी जलसेन यांच्या दि.१७.०९.२०११ च्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री.अमोल** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



**श्री. गोरखनाथ बाबुराव मैड** रा.सुपे यांनी त्यांच्या दि. १४.०८.२०११ च्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.६१००/-** देणगी दिली.



**श्री. पोपटराव नाना पायमोडे** रा.टाकळी ढोकेश्वर हे पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळात कार्यरत असून त्यांची मुख्याध्यापक पदावर पदोन्नती झाली आहे. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



**श्री.रावसाहेब सुखदेव जाधव** रा.वेसदरे यांनी त्यांचे सुपुत्र **चि. देवेश** (निशाद) याच्या दिनांक १०.०८.२०११ च्या प्रथम वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.५००१/-** देणगी दिली.



**श्री.मदनलाल दलीचंद शिंगवी** रा.पारनेर यांच्या दि.०९.०९.२०११ रोजीच्या सहस्त्रचंद्रदर्शन (८१ वा वाढदिवस) सोहळ्यानिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री. प्रदीप** यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.



**श्री.अशोक दगडूराम कटारिया** रा. तिखोल यांनी मातोश्री **स्व.श्रीमती झमकुबाई दगडूराम कटारिया** यांच्या ९.३.२०१० च्या स्मृतीदिनाप्रित्यर्थ मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



**श्री. राजेंद्र खंडू थोरात**, रा. पाडळी आळे यांनी त्यांचे पिताश्री **कै.खंडू गेणू थोरात** यांचे दि. ११.११.२०११ चे स्मृतीदिनामित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

## नांदा सौख्य भरे

- श्री.तुकाराम साहेबराव चत्तर रा.सिद्धेश्वरवाडी यांचे सुपुत्र **चि.शशिकांत** व श्री.शंकर रामचंद्र वराळ रा.निघोज यांची सुकन्या **सौ.प्रियंका** यांचा शुभविवाह दिनांक **१४.०५.२०११** रोजी संपन्न झाला.
- श्री.अशोक बळवंतराव पवार रा.सुपे यांचे सुपुत्र **चि.शिवराज** व श्री.प्रकाश संभाजीराव देशमुख रा.पिंपरणे, ता.संगमनेर यांची सुकन्या **सौ. प्रतिमा** यांचा शुभविवाह **दि. २५.०६.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री. पवार यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.
- श्री. दिलीप कृष्णाजी भालेराव रा.पारनेर यांची सुकन्या सौ.दिप्ती व श्री. रविंद्र दत्तात्रय वाडेकर रा.पुणे यांचे सुपुत्र **चि.निलेश** यांचा शुभविवाह **दि.११.०६.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.भालेराव यांनी मंडळास **रू.२५००/-** देणगी दिली.
- श्री. दिलीप कृष्णाजी भालेराव रा.पारनेर यांचे सुपुत्र **चि.मयुर** व श्री.संजय एकनाथ वैद्य रा.पुणे यांची सुकन्या **सौ.वसुधा** यांचा शुभविवाह **दि.०२.०८.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.भालेराव यांनी मंडळास **रू.२५००/-** देणगी दिली.
- श्री. संभाजीराव दगडूभाऊ कपाळे रा.भाळवणी यांची सुकन्या **सौ.क्षितीजा** व श्री.विश्वनाथ मल्हारी फापाळे रा.गारगुंडी यांचे सुपुत्र **चि.विकास** यांचा शुभविवाह **दि.२७.०७.२०११** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.कपाळे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
- श्री. बबन धोंडीबा तरटे रा.पळवे खुर्द यांचे सुपुत्र **चि.मोहन** व श्री.वामन धोंडीभाऊ गावखरे रा.चास ता.नगर यांची सुकन्या **सौ.सुवर्णा** यांचा शुभविवाह **दि.२७.११.२०११** रोजी संपन्न झाला.

**श्री अर्जुन भाऊसाहेब औटी**, रा. पारनेर यांनी त्यांचे पिताश्री **कै.भाऊसाहेब गोपाळा औटी** व मातोश्री **कै.लिलावती भाऊसाहेब औटी** यांचे स्मरणार्थ मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.

**सभासद, हितचिंतक व देणगीदार यांना**

# नववर्ष २०१२

**सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो !**

**पारनेर तालुका मित्र मंडळ**

# वेगळ्या वाटा




## कु.निरजा शिरीष लोळगे

ग्रामीण भागातील विद्यार्थी व त्याहीपेक्षा पालकांनी जर डोळसपणाने आपल्या पाल्याची आवड व क्षमता विचारात घेऊन वेगळे पाऊल उचलले तर पाल्य सुद्धा त्यास उत्तमप्रकारे साथ देऊन पालकाने टाकलेला विश्वास सार्थ ठरवितो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कु.निरजा शिरीष लोळगे. कु.निरजा हीस लहानपणा-पासूनच वक्तृत्व, वादविवाद, कथाकथन, इ. मध्ये आवड आहे. शालेय जीवनात तिने अनेक पारितोषीके मिळवली.

सर्वसाधारण हुशार विद्यार्थी शास्त्र शाखेतच प्रवेश घेतो. परंतु कु.निरजाने १०वी नंतर जाणीवपूर्वक कला शाखेत प्रवेश घेतला. भविष्यकाळात परकीय भाषेचे महत्व लक्षात घेऊन ११वी पासूनच फ्रेंच भाषेचा अभ्यास सुरु केला. त्याकरीता फ्रान्स सरकारची फ्रेंच भाषेतील पदविका सुद्धा मिळविली व बी.ए. विथ फ्रेंच ही पदवी मिळविली. सध्या ती पुणे विद्यापीठात फ्रेंच भाषा घेऊन एम.ए. करीत आहे.

या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणजे फ्रेंच भाषा व संस्कृती याच्या उच्चाभ्यासासाठी ती दि. ०५.०५.२०११ रोजी फ्रान्सला पुढील शिक्षणासाठी रवाना झाली. या सर्व उपक्रमास कु.निरजा हिचे वडील ॲड. शिरीष लोळगे यांनी मुलगी असुनसुद्धा तिला सर्व सोयी व संधी उपलब्ध करून दिल्या. तसेच मातोश्री सौ. विद्या व आजी श्रीमती नलिनी यांनीसुद्धा सकारात्मक प्रोत्साहन दिले. ॲड.शिरीष लोळगे हे शिरुर येथील न्यायालयात वकीली करतात. त्यांचे मूळ गाव गारगुंडी असून ते आपले गाव विसरले नाहीत. पारनेर तालुका मित्रमंडळाचे ते सक्रीय कार्यकर्ते आहेत. कु.निरजा हिच्या भावी वाटचालीस मंडळातर्फे हार्दीक शुभेच्छा.

**शब्दांकन - सुनील पोटे**



## खुशालचंद पिरचंद शिंगवी

खुशालचंद पिरचंद शिंगवी हे कान्हूर पठारचे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून त्यांनी पुण्यासारख्या ठिकाणी येऊन अनेक व्यवसाय करुन नावारूपास आले. नुकतीच त्यांनी वयाची पंच्याहत्तरी पार केली. खरे म्हणजे पंच्याहत्तर वर्षे म्हणजे निवृत्तीचे वर्ष. परंतु आयुष्याच्या प्रत्येक वळणावर अनेक लोकांनी सहकार्य केले. काही ठिकाणी वेगळा सुद्धा अनुभव आला. परंतु तो बाजुला टाकून खुशालजी पुढे जातच राहिले. आणि जाताना त्यांचे आजुबाजुचे जगाचे निरीक्षणही चालू होते.

काय करावे हे सुचेना. परंतु एका वळणावर त्यांनी पाहिले की कुष्ठ पिडीतांना समाजात कुठलेही स्थान नाही. त्यांचा कुठलाही दोष नसताना त्यांना नकारात्मक वृत्तीतून समाज बाहेर लोटतो. त्यामुळे ते अस्वस्थ होत होते. त्यातूनच त्यांनी गेली २० वर्षे कुष्ठ पीडीतांना दर दिवाळीस फराळाचे देण्याचा उपक्रम सुरु केला. त्यांच्या असे लक्षात आले की, ते आपलेसारखेच माणसे असुनसुद्धा त्यांना गिरणीमध्ये कोणी पीठसुद्धा दळून देत नाहीत. कोणाच्या तरी हस्ते परहस्ते ते करावे लागते. म्हणून त्यांनी ठरविले की त्यांना वास्तूसह पिठाची गिरणी घेऊन द्यावयाची. दापोडीजवळ कुष्ठरोग्यांची वसाहत आहे. तेथे त्यांनी जागा आणि पिठाची गिरणी घेऊन ती त्या वसाहतीला अर्पण केली आणि आपला अमृतोत्सव आणि विवाहाचा सुवर्णमहोत्सव अशा वेगळ्या प्रकारे साजरा केला. ज्या समाजाने वाढविले, स्थान मिळवून दिले त्याच समाजाची ऋण फेडण्याची ही एक आगळीवेगळी वाट. कुणीही आदर्श घ्यावा असे हे त्यांचे आयुष्य आहे.

**शब्दांकन - हौसाराम घोडके**


# निधन वार्ता



**विलास रामदास महांडुळे,** वय ५५ वर्षे, रा. सारोळे अडवाई यांचे **दि.११.१०.२०११** रोजी निधन झाले.



**श्रीमती शांताबाई किसनराव गुंजाळ,** वय ७० वर्षे, रा.सिद्धेश्वरवाडी यांचे **दि. २२.१०.२०११** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे नातू श्री.युवराज प्रभाकर गुंजाळ यांनी **रू.१०००/-** देणगी दिली.



**धोंडीबा कोंडीबा मापारी,** वय ६९ वर्षे, रा. राळेगण सिद्धी यांचे **दि.२७.१०.२०११** रोजी निधन झाले. त्यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री.भरत यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.


**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा, आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**

# निधन वार्ता

**श्रीमती लक्ष्मीबाई संपतराव मुळे,** वय ८२ वर्षे, रा. शेरी कासारी यांचे **दि.०३.०७.२०११** रोजी निधन झाले.



**धोंडीबा भाऊ झावरे,** वय ७५ वर्षे, रा. भोंद्रे यांचे **दि.०८.०७.२०११** रोजी निधन झाले.



**महादू पांडूरंग कावरे,** वय ८७ वर्षे, रा. सिद्धेश्वरवाडी यांचे **दि.२१.०७.२०११** रोजी निधन झाले.




**बाबुराव आप्पाजी बोरूडे,** वय ९५ वर्षे, रा.सिद्धेश्वरवाडी यांचे **दि.२९.०७.२०११** रोजी निधन झाले.



**नारायण सहादू घोडके,** वय ७८ वर्षे, रा.पारनेर यांचे **दिनांक २९.०८.२०११** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री. दत्तात्रय यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



**श्रीमती बाळुबाई विठोबा झरेकर,** वय ९० वर्षे, रा. कोहोकडी यांचे **दि.०४.०९.२०११** रोजी निधन झाले.



**सौ.पारुबाई गेणू तांबे,** वय ८० वर्षे, रा. कान्हूरपठार यांचे **दि.१३.०९.२०११** रोजी निधन झाले.



**श्रीमती अंजनाबाई देवराम झावरे,** वय ९५ वर्षे, रा. गारगुंडी यांचे **दि.२०.०९.२०११** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री. शिवाजीराव यांनी मंडळास **रू.१५०१/-** देणगी दिली.




**अंबादास बाळाजी दहिवळ,** वय १०९ वर्षे, रा. पिंपरी जलसेन यांचे **दि. १६.१०.२०११** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री.गंगाधर व अशोक यांनी प्रत्येकी **रू. १०००/-** तसेच त्यांच्या कन्या सौ.रूक्मिणी संभाजीराव काजळे यांनी **रू.५००/-** देणगी दिली.

# भावपूर्ण निरोप



❋ **सौ. अरूणा शिवाजीराव धुमाळ,** (मो.९८८१०२८५३९) रा.टाकळी ढोकेश्वर या पुणे जिल्हा परिषद शिक्षण विभागातून शिक्षिका म्हणून **दि. ३१.०५.२०११** रोजी ३७ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❋ **प्रा.पोपटराव कुंडलीक दिवटे** (मो. ९७६७१६१६५६) रा. बाबुर्डी हे शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मु. तवा, ता. डहाणू, जि. ठाणे येथून **दि.३१.०५.२०११** रोजी ३० वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.



❋ **श्री.गुलाबराव वाघाजी गावडे** (मो. ९९२१५१६७४१) रा. कन्हेरसर, ता. राजगुरुनगर, जि.पुणे हे किर्लोस्कर ऑईल इंजिन खडकी येथून **दि.३१.०६.२०११** रोजी ४१ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.




❋ **प्रा.सदाशिव पाटीलबा सालके** (मो. ९९७५५३८३५०) रा. जवळे हे रयत शिक्षण संस्थेच्या श्री साईनाथ कनिष्ठ महाविद्यालय अळकुटी येथून **दि.३१.०७.२०११** रोजी ३४ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.



❋ **प्रा.डॉ.चिमणराव श्रीपतराव दळवी** (मो. ९५५२५०८५८६) रा. हंगे हे दापोली येथील डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातून कीटक शास्त्रज्ञ व जनसंपर्क अधिकारी या पदावरून **दि.३१.१०.२०११** रोजी ३५ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.

**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा, आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**

# कर्तृत्व पारनेरकरांचे - कृषिमहर्षी, कृषितज्ञ डॉ.मुकुंदराव गायकवाड



महाराष्ट्रातील नामवंत **कृषिमहर्षी, कृषितज्ञ** व कृषी क्षेत्रात महान कार्य करून **अभ्यासू पत्रकार** म्हणून नावलौकीक मिळविलेल्या **डॉ.मुकुंदराव गायकवाड** यांचा जन्म १६ जुलै १९४४ रोजी पारनेर तालुक्यातील रूई छत्रपती या गावात सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. आई चंद्रभागाबाई यांच्या सुसंस्कृत संगोपनाने डॉ.मुकुंदरावांचा पाया मजबूत घडला गेला. लहानपणापासूनच त्यांना शिक्षणाची जबरदस्त ओढ होती. वडिलांनी सुद्धा त्यांना शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत केली. पुण्यात कृषी महाविद्यालयातून पदवी पूर्ण करून फलोद्यान विषयात एम.एस्सी. (कृषी) व नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेमध्ये **विशेष प्राविण्यासह पी.एच्.डी.** पदवी घेवून अहमदनगर जिल्ह्यातील पहिला कृषी क्षेत्रातील डॉक्टर होण्याचा मान मिळविला. त्याचबरोबर पुणे विद्यापीठाच्या **बी.एड्.** व **एल.एल.बी.** या सारख्या विविध पदव्या नोकरी करत असताना अभ्यासू वृत्तीने मिळविल्या.

डॉ.मुकुंदराव गायकवाड यांनी कृषी महाविद्यालय येथे प्राध्यापक व फलोद्यान विषयात विविध संशोधन केंद्रावर शास्त्रज्ञ म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे २० वर्षे नोकरी केली. सामाजिक कार्याची मनापासून तळमळ असल्यामुळे पारनेरसारख्या दुष्काळी तालुक्यात स्वतंत्र शिक्षणसंस्था काढली. कृषी साहित्यामध्ये मोलाची भर घालण्याचे मोलाचे काम डॉ.गायकवाड हे अभ्यासू वृत्तीने वर्षानुवर्षे करीत आहेत.

दै. सकाळ या पत्रामधून महाराष्ट्रात सर्वप्रथम **कृषी पुरवणी अंतर्गत शेती सदर** सुरु करण्याचा मान डॉ.गायकवाड यांनी पटकाविला व कृषी ज्ञानाचे भांडार सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी खुले केले. शेतीविषयक आधुनिक ज्ञान व तंत्रज्ञान यावर आधारीत **५००० लेख प्रकाशित करून डॉ.गायकवाड यांनी इतिहास घडविला.** त्यांनी असंख्य **कृषिविषयक मराठी पुस्तके प्रकाशित केली** आहेत. त्यांच्या या लिखाणाबद्दल त्यांना **बळीराजा, वि.ग.राऊळ पुरस्कार, साहित्य परिषदेचा श्रेष्ठता पुरस्कार** व अलिकडेच त्यांना **स्व.बाळासाहेब भारदे पुरस्कार** प्राप्त झाला आहे. केवळ प्रसिद्धीसाठी लिखाण न करता शेतकरी वर्गाला प्रबोधन व्हावे, नवीन संशोधन व उत्पादन वाढीचा मार्ग मिळावा म्हणून उद्‌बोधक लिखाण डॉ. गायकवाड करीत आहेत.

विद्यार्थी दशेपासून आजतागायत लौकीक सुखाची किंमत मोजून अनामिक राहून ग्रामीण भागासाठी नवे स्वप्न पाहण्याची हिंमत त्यांनी दाखविली आहे. सरकारवर अवलंबून न राहता जनतेच्या सहाय्याने काम उभे करण्याचा संकल्प सोडून दुष्काळी भागासाठी बंडींग, पाझर तलाव, पाऊस पकडा, पाणी साठवा, उपसा जलसिंचन, मध्यम पाटबंधारे, आरोग्य प्रकल्प, अहमदनगर शेळीपालन व प्रक्रीया उद्योग, फळफुल सोसायटी, महाराष्ट्र विकास केंद्र इ. अनेक संस्था त्यांनी उभ्या केल्या. सरकारी व इतर लाभापासून दूर राहिलेल्या राजकारणाच्या आखाड्यातही सामील होऊन अलिप्त झालेला, शेती कृषी विद्यापीठातील नोकरी, कृषी विद्यापीठातील संशोधन, वकिली, औद्योगिक कन्सलटन्सी, व्हीजीटींग प्रोफेसर इ. सर्व क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य तसेच सामाजिक बांधीलकी काळजीपूर्वक जपणारे हे चतुरस्त्र व्यक्तिमत्व. अजुनही त्यांच्या प्रबोधनाचे कार्य अव्याहतपणे चालूच आहे.

**शब्दांकन - सुनील पोटे**

## अभिनंदन




आर्यन भट असोसिएशन (युएसए) तर्फे मोटारसायकल स्पर्धा घेण्यात येतात. त्यात **सॅडल सोअर** हा एक विक्रम असून यासाठी **२४ तासात १६०० कि.मी.** अंतर पार करावयाचे असते. आतापर्यंत भारतामध्ये फक्त १० जणांनी हा विक्रम केलेला आहे. **कु.हेमंत तुळशीराम मोरे** वय २० रा.वडझिरे याने दि.१०.११.२०११ रोजी पहाटे ३ वा. सिटी प्राईड सातारा रोड येथून सुरुवात करून तो पुणे बेंगलोर नॅशनल हायवे नं. ४ वर नॉनस्टॉप धावून दि.११.११.२०११ रोजी पहाटे ३ वाजण्याच्या अगोदरच त्याने हे अंतर **२० तास ५६ मिनीटांत** पार केले व तो भारतातील **११वा सॅडल सोअर** ठरलेला आहे. प्रसिद्ध बांधकाम व्यावसायीक **श्री.रामाशेठ एरंडे** रा.वडझिरे यांनी या उपक्रमासाठी त्याला सर्व आर्थिक व इतर मदत केलेली आहे. यामध्ये **श्री.रामाशेठ एरंडे** यांचे सामाजिक दायित्व प्रकर्षाने दिसून आले.



**कु.प्राजक्ता परशुराम बोरूडे** रा.सिद्धेश्वर वाडी ही डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक अँड टेलिकम्युनिकेशनच्या शेवटच्या वर्षाला ८१ टक्के गुणाने उत्तीर्ण झाली.



**कु.योगीता रामचंद्र ठुबे** रा.पारनेर हीस **डी.एड्.** यामध्ये ७८ टक्के गुण प्राप्त झाले.




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु झाले असून विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश देणे सुरु झाले आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ठुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री. सुनील तोटे (tsunil9657@gmail.com) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ______________________

______________________

______________________

______________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.- ९४२०६९६७९०